महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
विभागीय मंडळ, पुणे.४११००५

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION, PUNE. 411005

E-MAIL - sscboardpune@gmail.com

क्रमांक पुविमं/डिपी/6464
पुणे४११ ००५
दिनांक 10/12/2024.

प्रति,

सर्व केंद्रसंचालक,
(मुख्याध्यापक, प्राचार्य),
इ.१०वी व इ.१२वी,
जिल्हा- पुणे, अहिल्यानगर व सोलापूर.

विषय- माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२वी) २०२५ साठी सी सी टी व्ही कॅमेरे, जनरेटर/इनव्हर्टर हमीपत्र सादर करणेबाबत.

संदर्भ- सी सी टी व्ही कॅमेरे संदर्भात शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचा दिनांक २१/०८/२०२४ रोजीचा शासन निर्णय.

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, इ.१०वी व इ.१२वी परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२५ करिता आपल्या केंद्र परिसरात तसेच केंद्रावरील सर्व वर्गखोल्यांमध्ये सी सी टी व्ही कॅमेरे कार्यान्वीत असल्याबाबतचे हमीपत्र या कार्यालयास दिनांक १५/१२/२०२४ पर्यंत सादर करण्यात यावे. परीक्षा कालावधीतील सी सी टी व्ही कॅमेरा रेकॉर्डींग परीक्षा संपल्यानंतरही आपल्याकडे स्वतंत्ररित्या जतन करुन ठेवणे आवश्यक आहे. मंडळाच्या मागणीनुसार सदर रेकॉर्डींग त्वरीत उपलब्ध करुन देण्यात यावे. विद्युत पुरवठा खंडित झाला तरीही केंद्रावर जनरेटर / इनव्हर्टर असल्याने सी सी टी व्ही कॅमेरे रेकॉर्डींग असणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.

सर्व परीक्षा केंद्रांवर अखंडीत विजपुरवठा ठेवण्याकरिता जनरेटर / इनव्हर्टर कार्यान्वीत असणे आवश्यक आहे. तरी सर्व परीक्षा केंद्रांवर जनरेटर व इनव्हर्टर असल्याबाबतचे हमीपत्र दिनांक १५/१२/२०२४ पर्यंत सादर करण्यात यावे.

सोबत- हमीपत्र नमूना.

(औदुंबर उकिरडे)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे-४११००५.

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**पुणे विभागीय मंडळ, पुणे ४११ ००५.**

इ. १० वी व इ. १२ वी परीक्षा फेब्रु-मार्च २०२५ करीता

सीसीटीव्ही कॅमेरे व जनरेटर/इनव्हर्टर कार्यान्वित असलेबाबतचे हमीपत्र

शासन निर्णय दि. २१.०८.२०२४ नुसार सर्व शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांवर सीसीटीव्ही कॅमेरे अनिवार्य करण्यात आलेले आहे. परीक्षेचे महत्व पाहता सर्व केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित असून त्याचे रेकॉर्डिग उपलब्ध आहे. आवश्यकतेनुसार सदरचे रेकॉर्डिग मंडळ कार्यालायस पुरविण्यात यईल याबाबत हमी देण्यात येत आहे.

तसेच परीक्षा केंद्रावर अखंडीत विजपुरवठा सुरु ठेवण्याकरिता केंद्रावरजनरेटर / इनव्हर्टर कार्यान्वीत असल्याबाबतचे हमीपत्र देण्यात येत आहे.

दिनांक :
स्थळ :

केंद्र संचालक,
केंद्र क्रमांक-------